महाराष्ट्र वन विभाग

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**वन विभाग**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती कॅम्प, अमरावती - 444602**
**दुरध्वनी क्र.** (0721) 2662090/2662593/2662680, (वैयक्तिक) **फॅक्सक्र.**- 2663314
**ई-मेल :** aticcfa@gmail.com / ccftamravati@mahaforest.gov.in/ **हॅलो फॉरेस्ट (नि:शुल्क) 1926**

---

आदेश क्रमांक :- 241 अमरावती -२, दिनांकः- 21-2-2024

संदर्भ:- १ उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग, अमरावती यांचे आदेश क्रमांक-५३२, दिनांक ०४.०५.२०२३.

२ या कार्यालयाचे पत्र क्रमाक कक्ष-८/आस्था-टी-३/निलंबन आढावा बैठक/ १५६९ / २०२३-२४, दिनांक २४.०८.२०२३.

३ विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय,अमरावती यांचेकडील पत्र क्र.विआकाअ /अ.का./ म.शा.२ / निआसबै/कावि-१९/२०२४, दिनांक १८.०१.२०२४.

ज्याअर्थी श्री जगदिश देविदास बलोदे, हे वनपाल उदखेड वर्तुळ, मोर्शी (प्रा.) परिक्षेत्र या पदावर कार्यरत असतांना त्यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती यांनी पोलीस स्टेशन मोर्शी, अमरावती ग्रामिण येथे अपराध क्रमांक १८२/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच त्यांना दिनांक 29.04.2023 रोजी अटक करण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 च्या नियम 4 (1) (क) अन्वये श्री जगदिश देविदास बलोदे, वनपाल यांना उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग, अमरावती यांचे दिनांक 04.05.2023 रोजीचे आदेशान्वये अटक करण्यात आल्याचे दिनांकापासून म्हणजेच दिनांक 29.04.2023 पासून निलंबित करण्यात आलेले आहे.

2. ज्याअर्थी संदर्भ क्रमांक 3 अन्वये निलंबन आढावा समितीने श्री. जगदिश देविदास बलोदे, वनपाल यांच्या निलंबनाचा आढावा घेवून त्यांच्याविरूध्द सुरु असलेल्या न्यायालयीन खटला व विभागीय चौकशीच्या अधीन राहून त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करून अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्याची शिफारस केली आहे.

3. त्याअर्थी, आता महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 च्या नियम 4 च्या पोटनियम (5) च्या खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून या आदेशाद्वारे श्री जगदिश देविदास बलोदे, वनपाल यांना त्यांचेविरूध्द प्रलंबित न्यायालयीन खटला व विभागीय चौकशीच्या अधीन राहून अकार्यकारी पदावर शासन सेवेत पुन:स्थापीत करण्यात येत आहे. पुन:स्थापनेनंतर श्री. जगदिश देविदास बलोदे, वनपाल यांची पदस्थापना उपवनसंरक्षक, अकोट वन्यजीव विभाग, अकोट अंतर्गत सोमठाणा परिक्षेत्रातील विशेष सेवा कहुपाणी (संरक्षण शिबिर) या रिक्त असलेल्या अकार्यकारी पदावर करण्यात येत आहे.

4. श्री.जगदिश देविदास बलोदे, वनपाल यांचेविरूध्द सुरू असलेली न्यायालयीन तसेच विभागीय चौकशीची कार्यवाही त्यांच्या पुन:स्थापनेनंतरही सुरु राहील.

श्री. जगदिश देविदास बलोदे, वनपाल यांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजु व्हावे. श्री. जगदिश देविदास बलोदे, वनपाल हे नियुक्तीच्या ठिकाणी ज्या दिवशी प्रत्यक्ष रुजु होतील त्या तारखेपासून त्यांचे निलंबन समाप्त होईल.

Jayoti Banerjee
21/2/24

(जयोती बॅनर्जी)
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक) अमरावती

क्रमांक: कक्ष-८ / आस्था टी-३ / 3258 /२०२३-२४
अमरावती- २, दिनांक 21-2-2024

प्रति,

श्री. जगदिश देविदास बलोदे, वनपाल
मार्फत :-उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग,अमरावती.

प्रतिलिपी:- विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती यांना माहीतीस सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी :-मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांना माहीतीस सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी :-उपवनंसरक्षक, अकोट वन्यजीव विभाग, अकोट यांना माहीतीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी :-उपवनंसरक्षक, अमरावती वनविभाग, अमरावती यांना माहीतीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रत :- आदेश फाईल.